# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र.CIC/अ.क्र.६०६८ ते ६०७३/२०२६

श्री.गणेश जे. जायसवाल,
पोस्ट बाक्स नम्बर- ९२२१,
घाटकोपर पोस्ट आफिस, घाटकोपर,
वेस्ट, मुंबई, ४०००८६.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का-४) एम/पूर्व,
सहाय्यक अभियंता (इ व का-४) एम/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
पहिला मजला, कै.मधुकर तु. कदम मार्ग, गोवंडी, मुंबई-४०० ०४३.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता तथा पदनिर्देशित अधिकारी,
खोली क्रमांक- १०३, मनपा., एम/पूर्व विभाग, पहिला मजला,
कै.मधुकर तु. कदम मार्ग, गोवंडी, मुंबई-४०० ०४३.

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १५.०७.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

अपिलार्थीनी दाखल केलेल्या वरील सर्व **जोडपत्र अ** मध्ये अनधिकृत बांधकामा संदर्भात त्यांनी केलेल्या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितली असून वरील सर्व माहिती ही RETMS म्हणजेच www.removalofencroachment.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर माहिती ही संकेतस्थळावरून प्राप्त करून घेण्याचा प्रतिसाद देण्यात आला असून याविरुद्ध दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इमारत व कारखाने, एम/पूर्व विभागाने त्यांच्या आदेशात जन माहिती अधिकाऱ्यांची भेट घेऊन स:शुल्क माहिती प्राप्त करून देण्याचे निर्देश दिले असल्याचे आढळून येते. तथापि, अपिलीय अधिकारी यांच्या आदेशावर देखील माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याबाबत अपिलार्थीनी तक्रार केली असून माहिती देण्याची आग्रही भूमिका तसेच जन माहिती अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीनी मागितलेली माहिती ही या आधीच संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचा प्रतिसाद हा जन माहिती अधिकाऱ्यांनी दिला असून दाखल केलेला माहिती अर्ज व दिलेला प्रतिसाद हा साधारणपणे मे-२०२२ या कालावधीतील असून अपिलार्थीच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने प्राप्त आदेशावर

कार्यवाही झाली नसल्याचा त्यांचा आक्षेप लक्षात घेता उपरोक्त द्वितीय अपील अर्ज अंशतः मंजूर करीत यामधील विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, इमारत व कारखाने, एम/पूर्व यांनी अपिलार्थीच्या मूळ तक्रार अर्जावर तसेच माहिती अर्जात नमूद कथित अनधिकृत बांधकामाबाबत सुधारित व अद्ययावत उत्तर देण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबद्ध करण्यात येत आहेत.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल क्र. ६०६८ ते ६०७३/२०२६ निकाली काढण्यात येत आहेत.**

स्वाक्षरीत/-

**मुंबई** **( राहुल भा.पांडे )**

**दिनांक : १५-०७-२०२६** **राज्य मुख्य माहिती आयुक्त**